# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २०.०६.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १९.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०५ ईसमांवर कारवाई करून ३,४६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमांवर कारवाई करून २,१३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३५५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,३५,३७७/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २०.०६.२०२६ चे ०२.४० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभागाचे अधिकारी व अंमलदार हे **'अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम'** राबविताना अंमली पदार्थ बाळगणारे, विकणारे ईसमांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती—नागपूर रोडवरील ईडीएम अड्डा रेस्ट्रो लाऊंज समोर सार्वजनिक ठिकाणी त्यांना टाटा कंपनीचा ट्रक क्र. डीएन ०९ व्ही ९०१२ हा संशयीतरित्या उभा केलेला व त्यामध्ये ट्रक चालक हा कुणाची तरी वाट बघतांना दिसुन आला. वाहन चालकास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मोहम्मद शफीक वल्द मोहम्मद जहरुद्दीन खान वय ३२ वर्षे, रा. १०५, साई रेसीडेन्सी—२, सद्भावना सोसायटी, कडोदरा वरेली, सुरत, गुजरात, ह.मु.— पोलीस ठाणे अंतु जवळ, प्रतापगढ, उत्तरप्रदेश असे सांगीतले. पंचासमक्ष ट्रकची पाहणी केली असता, ट्रकचे मागील डाल्यात पांढरे रंगाचे प्लास्टीकच्या बोरी दिसून आल्या. बोरींची पाहणी केली असता, त्यामध्ये ब्राऊन टेपने सहा पाकीटे व एक काळ्या रंगाचे प्लास्टीक पन्नीमध्ये हिरवट काळसर फुले व फळे आलेला उग्र वास असणारा अंमली पदार्थ गांजा एकुण वजनी ३५ किलो ५०० ग्रॅम वजनाचा मिळुन आला. आरोपीस सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी अयाज खान नावाचे इसमाने खरेदी विक्री करीता आणून दिल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन गांजा, ०१ मोबाईल फोन व ट्रक वाहन असा एकुण २३,०७,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा खरेदी—विक्री करण्याकरीता

बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करुन मुद्देमालासह वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननवरे, नापोअं. शेषराव राऊत, पोअं. अश्विन मांगे, कुणाल मसराम, नितीन वासनिक व ऋषिकेश डुमरे यांनी यांनी केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १९.०६.२०२६ चे १७.२५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत बाराखोली, गली क्र. १०, रिपब्लीकन नगर येथे राहणारा इसम नामे सुरज निरंजन मेश्राम वय २८ वर्ष हा आपले राहते घरी तंबाखुजन्य पदार्थाचा साठा बाळगुन आहे. अशा प्राप्त खात्रीशीर माहीतीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह सुरज मेश्राम याचे घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे एक इसम दिसून आला. त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव सुरज निरंजन मेश्राम वय २८ वर्ष, रा. बाराखोली, रिपब्लीकन नगर, गल्ली नं. १०, जरीपटका, नागपुर असे सांगीतले. त्याचे राहते घराची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे त्याने शासनाने प्रतिबंधीत केलेले वेगवेगळ्या कंपनीचे, वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु चा साठा केल्याचे दिसून आले. आरोपीचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपनीचे व फ्लेवरचे तंबाखु रिमझीम जाफरानी जर्दा, व्हीवन तंबाखु निळया व जांभळया रंगाची, सुगंधी तंबाखु मिश्रीत खर्रा, गोल्ड ब्रान्ड सुपारी व खर्रा बनविण्याचे यंत्र असा एकुण किंमती ४४,९७६/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी श्री अमरनाथ यादव सोनटक्के, वय ४४ वर्ष यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम २२३,२७४,२७५,१२३ भा.न्या.सं. सहकलम २६(१), २६(२)(iv),३(१)(zz)(iv),२७(३)(e),३०(२)(a) अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. युवानंद कडू, मपोहवा. सपना जोशी, पोअं. दिनेश महल्ले, निलेश श्रीपात्रे, विरेंद्र पांडे, रविंद्र राऊत, सुनिलकुमार यादव व चापोहवा. मनिष मिश्रा यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन :— दुकानात चोरी करणाऱ्या महिला आरोपीस अटक.</u>**

फिर्यादी राहुल रविंद्र मस्के, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. ६८४, देशपांडे ले आऊट, त्रिमुर्ती नगर, नागपुर यांचे पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, भिमचौक, हिवरीनगर येथे 'दिक्षा ज्वेलर्स ॲन्ड इमिटेशन' नावाचे सोन्या—चांदीचे दुकान आहे. फिर्यादी यांना दुकानातील माल कमी दिसून आल्याने त्यांनी दिनांक ०१.०६.२०२६ ते ११.०६.२०२६ चे दरम्यान चे दुकानातील सीसीटिव्ही कॅमेऱ्याचे फुटेजची पाहणी केली असता, एक महिलेने फिर्यादीचे दुकानात वारंवार येऊन तसेच, फिर्यादी व त्यांचे वडीलांची नजर चुकवून दुकानातील सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी २५ ग्राम किमती २ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याचे दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. शशिकांत नागरगोजे ८५५९६९७३७० यांनी महिला आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, महिला आरोपी नामे मोनाली प्रमोद कावडकर, वय ३७ वर्ष, रा. ब्रम्हनगर, दिघोरी, नागपूर हिचा शोध घेऊन तिला अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे पाचपावली :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १७.०६.२०२६ चे १९.०० वा. ते २०.०५ वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना वैशालीनगर, आंबेडकर गार्डन, कलकत्ता रेल्वे लाईन जवळील रोडवर, सार्वजनिक ठिकाणी एक इसम हातात शस्त्र घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत असतांना दिसून आला. त्यास स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन निशस्त्र केले व पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव फलांश चेतन भिमटे, वय २१ वर्षे, रा. गली क्र. ०४, बारसे नगर, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी तलवार किंमती ५००/— रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. पवन भटकर यांनी

दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. कुणाल शेडमाके यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे राणा प्रतापनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०६.२०२६ चे १३.३० वा. ते १८.०६.२०२६ चे १२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत, प्लॉट नं. ५४, अणे ले आऊट, खामला, नागपुर येथे राहणारे व व्यवसायाने शिक्षक असणारे फिर्यादी प्रविणकुमार राजु त्यागी, वय ४६ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह दिल्ली येथे खाजगी कामानिमीत्त गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे जिन्याचा दरवाजा तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीमधील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व डायमंडचे दागिने तसेच, दिल्ली येथील प्लॉटची कागदपत्रे असा एकुण किंमती ३,९८,४००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथे मसपोनि. श्रध्दा वाघ ८३२९२९५२७६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**